(जा. क्र 06/2015) अनुवादक (मराठी), भाषा संचालनालय सामान्य राज्य सेवा गट - क

प. दि 12 डिसेंबर, 2015

**A**

**2015**

CODE : **YO6**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO. 100605

**प्रश्नपुस्तिका**

**मराठी व इंग्रजी**

**वेळ : 1 ( एक ) तास** | **एकूण प्रश्न : 60** | **एकूण गुण : 150**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 60 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ]
केंद्राची संकेताक्षरे ↑ ... ↑ शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

1. 'पक्ष' या शब्दासाठी समानार्थी शब्द कोणते ?

(a) बाजू (b) तट (c) अशील (d) पंधरवडा

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) फक्त (2) (d) फक्त

(3) (b) आणि (c) फक्त (4) (a), (b), (d) फक्त

---

2. पेरू ऐवजी संत्री घेतली. या वाक्यातील शब्दयोगी अव्ययाचा प्रकार ओळखा :

(1) परिमाणवाचक अव्यय (2) साहचर्यवाचक अव्यय

(3) योग्यतावाचक अव्यय (4) विनिमयवाचक अव्यय

---

3. उन्हामुळे त्याच्या चेहऱ्यावर घाम आला.

वरील वाक्यातील नामाचे रूपांतर क्रियापदात बदलून अचूक वाक्य कसे होईल ?

(1) उन्हामुळे त्याचा चेहरा घामाघूम झाला.

(2) उन्हामुळे त्याचा चेहरा घामेजला.

(3) उन्हामुळे त्याच्या चेहऱ्यावर घाम आला.

(4) उन्हामुळे त्याचा चेहरा घामेजून जाईल.

---

4. खालील पर्यायी उत्तरांतील 'व्यंजना शब्दशक्ती' असलेले योग्य पर्यायी उत्तर कोणते ?

(1) सर्प हा सरपटणारा प्राणी आहे.

(2) सर्प दंश घातक असतो.

(3) समाजात वावरणारे असले साप ठेचून काढले पाहिजेत.

(4) वरीलपैकी एकही नाही.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

5. खालील म्हण पूर्ण करा.

'भोळा ग बाई भोळा ________'

(1) गळ्यात घालतो माळा.
(2) सगळ्या देवांचा सोहळा.
(3) सगळ्या पापांचा गोळा.
(4) गुडघ्यात आणतो गोळा.

---

6. खाली शब्दसाधित शब्दांचे शब्दगट दिले आहेत. त्यापैकी अचूक शब्दगट ओळखा.

(a) मासिक, वार्षिक, धार्मिक
(b) अतिशय, करुन, लोक
(c) बोलणारा, करवते, आवडते
(d) दररोज, विशेष, दुर्लभ

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (c)
(2) (a) फक्त
(3) (b), (c) आणि (d)
(4) (a), (c) आणि (d)

---

7. खालील वाक्याचा प्रयोग कोणता, ते पर्यायी उत्तरांतून शोधा.

'वडिलांनी मुलाला शाळेत घातले.'

(1) कर्तृ-कर्म संकर प्रयोग
(2) कर्म-भाव संकर प्रयोग
(3) भावे प्रयोग
(4) कर्तृ-भाव संकर प्रयोग

---

8. पर्यायी उत्तरांतील 'शुद्ध शब्द' कोणता ?

(1) आवतीभवती (2) आवतीभोवती (3) अवतीभवती (4) अवतीभोवती

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

9. परकीय तसेच परप्रांतीय भाषेतून मराठी भाषेत आलेल्या शब्दांची यादी पुढे दिलेली आहे. त्यांच्या जोड्या लावा.

| परकीय/परप्रांतीय भाषा | | शब्द |
|---|---|---|
| (a) तेलगू | (i) | तुरुंग, साबण, पगार, बटाटा |
| (b) अरबी | (ii) | जमीन, कागद, दुश्मन, पोषाख |
| (c) फारसी | (iii) | अनारसा, शिकेकाई, ताळा |
| (d) पोर्तुगीज | (iv) | कबर, कसाई, किल्ला, गरज |

वरील जोड्यांच्या उत्तराचा योग्य तो पर्याय निवडा.

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (2) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| (3) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (4) | (iii) | (i) | (iv) | (ii) |

---

10. पर्यायी उत्तरांतील 'वचनविचारातील' गटाबाहेरचा शब्द कोणता ?

(1) दही (2) वही (3) पाणी (4) लोणी

---

11. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचा पर्यायी उत्तरांतील योग्य प्रकार कोणता ?

'आम्ही <u>त्याजकडे</u> बिऱ्हाड ठेविले.'

(1) कर्म (2) मूळ उद्देश्य (3) विधेय विस्तारक (4) मूळ विधेय

---

12. 'वर' शब्दाचे वेगवेगळे अर्थ घेऊन तयार केलेली अचूक वाक्ये निवडा.

(a) सुमनचे घर वरच्या बाजूस आहे.
(b) दादाने मला आशीर्वाद दिला.
(c) अजय आता नवरा झाला.
(d) वरीलपैकी एकही नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) फक्त (2) (a) आणि (c) फक्त
(3) (a), (b) आणि (c) (4) (d) फक्त

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

13. खालीलपैकी एकवचनी नामांची अनेकवचनी नामरूपे कोणती ?

(a) डबी - डब्या
(b) मिरी - मिऱ्या
(c) दिशा - दिशा
(d) भिंत-भिंत

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) फक्त
(2) (c) आणि (d) फक्त
(3) (a) आणि (c) फक्त
(4) (a), (c) आणि (d)

---

14. खालील वाक्यातील 'अप्रत्यक्ष कर्म' कोणते ?

'आजीने नातीला गोष्ट सांगितली'.

(1) गोष्ट (2) सांगितली (3) आजीने (4) नातीला

---

15. खालील पर्यायी उत्तरांतील कोणता 'प्रत्ययवाचक धातुसाधित' शब्द नाही ?

(1) कर (2) फूट (3) लाभ (4) मेळ

---

16. वर्तमानकाळासाठी कोणते 'आख्यात' वापरले जाते ?

(1) लाख्यात
(2) प्रथम - ताख्यात
(3) ऊ - आख्यात
(4) ईलाख्यात

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

17. खाली दिलेल्या समानार्थी शब्दांच्या जोड्या जुळवा.

| | शब्द | | समानार्थी |
|---|---|---|---|
| (a) | बैल | (i) | सविता |
| (b) | मृगेंद्र | (ii) | पोळ |
| (c) | भास्कर | (iii) | सिंह |
| (d) | रत्नाकर | (iv) | जलनिधी |

वरील जोड्यांच्या उत्तराचा योग्य पर्याय निवडा.

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (2) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (3) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (4) | (ii) | (i) | (iii) | (iv) |

---

18. खालील वाक्यातील 'उद्देश्य विस्तारक' कोणते ?

'त्याचे डोळे पाणीदार आहेत.'

(1) आहेत (2) पाणीदार (3) डोळे (4) त्याचे

---

19. (a) काही नामे नेहमी अनेकवचनी आढळतात (क्लेश, हाल)

(b) ढीग, समिती वगैरे शब्दांतील समूह हा एकच मानला जात असल्यामुळे ते एकवचनी ठरत नाहीत.

(c) जोडपे, त्रिकूट हे शब्दसमूह अनेक मानले तर एकवचनी ठरतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) चूक (2) (b) चूक

(3) (c) चूक (4) (a), (b), (c) तिन्ही चूक

---

20. अयोग्य शब्दगट ओळखा :

(1) रहाणे, वहाणे, पहाणे (2) बऱ्हाणपूर, नागपूर, शिरपूर

(3) मॅच, ब्रिटन, प्रोफेसर (4) सोयरीक, जवळीक, पडीक

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**पुढे दिलेला उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्नांची ( प्रश्न क्रमांक 21 ते 25) उत्तरे पर्याय वाचून लिहा.**

असे उद्‌गार विवेकानंदाच्या कार्याला उद्देशून काढले आहेत, तर मद्रास टाईम्सच्या 1895 च्या एका अंकात स्वामी विवेकानंदांच्या सर्वधर्मपरिषदेतील व्याख्यानाबद्दल मत व्यक्त करताना संपादक महाशयांनी 'ही राष्ट्र जागृतीची सुरुवात आहे' असे म्हटले आहे. हिंदू, मद्रास या वृत्तपत्राने सुद्धा 'स्वाभिमानाचे पुनरागमन' अशा शीर्षकाने स्वामी विवेकानंदांच्या कार्याचा गौरव केलेला आहे. स्वामी विवेकानंदांच्या भूमिकेसंबंधात बोलताना भगिनी निवेदिता म्हणतात-"स्वामी विवेकानंद राष्ट्रनिर्मितीतील आधारभूत कार्यकर्ते आहेत. कोणतीही पुस्तके न वाचता श्री रामकृष्ण म्हणजे वेदांताचे जिवंत सार होते, त्याप्रमाणे राष्ट्रजीवनाचे स्वामी विवेकानंद सार होते." तत्कालीन वृत्तपत्रांनी स्वामी विवेकानंदांच्या कार्याची थोरवी व्यक्त करताना अशा प्रकारचे उद्‌गार काढलेले दिसून येतात.

स्वामी विवेकानंद हे हिंदुत्वाचे प्रणेते होते. कोणत्याही समाजाला त्याच्या स्वधर्माची, स्वाभिमानी जाणीव करून दिल्याशिवाय पारतंत्र्याचे जोखड फेकून द्यावेसे वाटणार नाही, त्यादृष्टीने अत्यंत प्रेरणादायी कार्य स्वामी विवेकानंदांनी केले. अमेरिकेतून परत आल्यावर भारतीयांना त्यांच्या सुप्त सामर्थ्याची, त्यांच्या गौरवाची आणि त्यांच्या धर्माविषयीची जाणीव करून द्यावी, असे त्यांना प्रकर्षाने वाटले व त्यांनी आपले असे विचार अनेक भाषणांतून, लिखाणातून व्यक्त केलेले आहेत. स्वतंत्र, सर्वसंगपरित्याग केलेल्या कार्यकर्त्यांचे एक बलिष्ठ संघटन असावे असे त्यांना वाटू लागले होते.

भारतीय जनता अज्ञानी आहे. दु:ख, दारिद्र्य व अंधश्रद्धा यांनी ती पिचलेली आहे आणि म्हणून ती परंपरांच्या शृंखलात बंदिस्त झालेली आहे. तेव्हा या समाजाला नवीन संकल्पना, नवीन दृष्टी, वैज्ञानिक ज्ञान द्यावयास हवे असे स्वामी विवेकानंदांना वाटू लागले होते. भूतकाळाचा मागोवा घेतल्यास भारतातील धार्मिक चळवळ हीच नेहमी समाजपरिवर्तनाचे मूलगामी अंग राहिलेली आहे. समाजाला पुढे नेण्याचे कार्य या चळवळीने होऊ शकेल, राष्ट्रनिर्मितीचा एक मजबूत पाया म्हणून धर्माचे महत्त्व असाधारण आहे असे त्यांचे मत होते. हिंदुत्वाची चळवळ राष्ट्रनिर्मितीची चळवळ आहे, हिंदुत्वाच्या भावनेतून समाजाला एका सूत्रात बांधता येईल, एकाच राष्ट्राचे आपण नागरिक आहोत ही कल्पना दृढ करता येईल, हिंदुत्वाचा राष्ट्रधर्म म्हणून वापर होऊ शकतो, यादृष्टीनेच स्वामी विवेकानंदांनी आपले कार्य पुढे नेले. भगिनी निवेदितांनी स्वामी विवेकानंदांचे वर्णन "स्वामी विवेकानंदांचे कार्य एक धार्मिक द्रष्टा म्हणून असले, तरी भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे ते निर्विवादपणे आध्यात्मिक गुरू होते." अशा शब्दात केले आहे.

स्वामी विवेकानंदांनी जगाच्या इतिहासाचा सूक्ष्म अभ्यास केला होता. त्यांची विद्वत्ता, अनुभव आणि ब्रिटिश साम्राज्याच्या अंत:स्वरूपाला ओळखण्याची त्यांची चाणाक्ष वृत्ती ह्यामुळे त्यांना ब्रिटिश साम्राज्य ही इतरांप्रमाणे इष्टापत्ती वाटत नसे. उलट ह्या राज्यकर्त्यांमुळे येथील भारतीय संस्कृतीचे हनन होत आहे, असे त्यांचे ठाम मत होते. ज्यावेळी ब्रिटिश साम्राज्याचे तत्कालिन समाजात स्वकीयांकडून गोडवे गायिले जात होते, त्यावेळी या साम्राज्याच्या विनाशातूनच भारतीय विकास होऊ शकेल, असा स्वामी विवेकानंदांचा विश्वास होता. स्वामी विवेकानंद ब्रिटिश विरोधी नव्हते, परंतु साम्राज्यवाद विरोधी निश्चितच होते. खालील अवतरणातून त्यांची सूक्ष्म सामाजिक, राजकीय दृष्टी स्पष्ट होते.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**21.** पुढील दोन विधानांचा विचार करा.

(a) भारतीय जनता अज्ञानी आहे.

(b) आणि म्हणून ती परंपरांच्या शृंखलात बंदिस्त झालेली आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) दोन्ही बरोबर व (a) ही (b) ची कारणमिमांसा आहे.

(2) दोन्ही बरोबर परंतु (a) ही (b) ची कारणमिमांसा नाही.

(3) कोणतेही विधान योग्य नाही.

(4) (a) बरोबर (b) चूक.

---

**22.** सर्वधर्मपरिषदेतील व्याख्यानाबद्दल कोणती मते व्यक्त झालेली आहेत ?

(a) स्वाभिमानाचे पुनरागमन.

(b) राष्ट्र निर्मितीतील आधारभूत कार्यकर्ते म्हणून स्वामी विवेकानंदाकडे पाहता येईल.

(c) ही राष्ट्र जागृतीची सुरुवात आहे.

(d) स्वाभिमान्याच्या पुनरागमनाबद्दल कोणास पर्वा नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b) (2) (a), (c), (d)

(3) (a), (b), (c) (4) (a), (b), (c), (d)

---

**23.** स्वामी विवेकानंदांना भारतीयांच्या कोणत्या गुणांची जाणीव करून द्यावीशी वाटते ?

(a) गौरवाची

(b) भरकटलेल्या विचारांची

(c) सुप्त सामर्थ्याची

(d) धर्माविषयीची

**पर्यायी उत्तरे :**

(1) (b), (c) (2) (a), (b), (c) (3) (a), (c), (d) (4) (a), (d)

---

**24.** पुढील विधाने पहा :

(a) स्वामी विवेकानंद ब्रिटीश विरोधी नव्हते.

(b) स्वामी विवेकानंद ब्रिटीश साम्राज्यवादाविरोधी निश्चितच होते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) दोन्ही बरोबर (2) दोन्ही चूक

(3) (a) चूक (b) बरोबर (4) (a) बरोबर (b) चूक

---

**25.** 'राष्ट्रनिर्मितीचा एक मजबूत पाया म्हणून, धर्माचे महत्व __________ आहे असे स्वामी विवेकानंदांचे मत होते'. रिकाम्या जागी योग्य पर्यायी उत्तर लिहा.

(1) साधारण (2) बऱ्यापैकी (3) असाधारण (4) काहीसे

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**पुढे दिलेला उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्नांची ( प्रश्न क्रमांक 26 ते 30) उत्तरे पर्याय वाचून लिहा.**

एखादी मोटार-सायकल फडफडत घरासमोर थांबते. मुले-मुली नेटके कपडे घालून शाळेत जाताना दिसतात. तालुक्याच्या गावात असलेल्या कॉलेजला पोचण्यासाठी एखादा तरुण सायकल दामटीत असतो. पैरणीची जागा बुशशर्टने घेतली आहे. खळणा शर्ट आणि गांधी टोपी हा जमाना शे-दोनशे वस्तीच्या गावातही पोचला आहे.

लहानपणी गावाबाहेरचे उजाड माळ नाहीतर देवराष्ट्रच्या 'सोनहिरा' ओढ्याचे वाळवंट ही आमची खेळायची जागा. आट्यापाट्यांचा डाव तिथे चालायचा. आजकाल बऱ्याच ठिकाणी गावाबाहेरची शिवारे पाटाच्या पाण्याने ओली बनली आहेत. हिरवी झाली आहेत. जिथे अजूनही माळ आहे, ओढे कोरडे आहेत, विहिरी आटत आहेत, तिथली माणसे परिस्थिती बदलण्याचा ध्यास धरून आहेत, हे पाहिले म्हणजे समाधान वाटते. लहानपणी स्वातंत्र्याचा अर्थ कळत नव्हता तेव्हा हातात तिरंगी झेंडा धरून स्वातंत्र्य मागणाऱ्यांच्या प्रवाहात झोकून दिलेला मी. माणसानेच परिस्थिती बदलायची असते हा त्या स्वातंत्र्याचा अर्थ, आजही बदलणारी परिस्थितीच मला समजून देत आहे. मागे वळून पाहताना परिस्थितीचे कितीतरी टप्पे दिसू लागतात. पण त्यातल्या महारवाड्याच्या टप्प्याशी आले की आजही पाय तिथे घुटमळतात, गाव बदलायला निघालेल्या माणसांनी इथे का थांबू नये असे मनात येते. दया म्हणून नव्हे; माणूस म्हणून. सगळे सुखी तरच गाव सुखी. सर्व अवयव शाबूत आणि चांगले असले तरच ते शरीर चांगले! समाजशरीराचे सर्व अवयव चांगले हवेत.

ज्या समाज-सुधारणा करायच्या, घडवायच्या त्या जनतेच्या हृदयावर बिंबवल्या पाहिजेत; त्याशिवाय माणसामाणसांना संघटितपणे एकमेकांविरुद्ध वागण्यास शिकविणारा जातिवाद नाहीसा होणार नाही, निदान कमी होणार नाही.

तो टप्पा ओलांडून मी पुष्कळ पुढे आलो, पण अजूनही ती चर्चा ऐकायला मिळते. बुध्दिवंत त्यांच्या भाषेत बोलतात. राजकारणी भाषेला धार लावून बोलतात आणि प्रत्यक्षात खेडी कृतीने बोलकी बनत आहेत. वाटचाल सुरुच आहे. रस्त्यात काही खुणेच्या गोष्टी आढळतात आणि वाटचाल बरोबर मार्गाने होत राहिली आहे ना, हे त्या खुणा सांगतात. त्या खुणा काही वेळेला कानगोष्टीही करतात. आणि माझ्यासारख्या वाटसरूला पुढे ढकलतात. मी हा अनुभव घेतला आहे, घेत आहे. या अनुभवांनी मला काही धडेही दिले आहेत. वाटचाल करताना दमछाक होणे, निराशा येणे हे घडतच असतं.

---

26. पुढील विधाने पहा :

(a) स्वातंत्र्याचा अर्थ असा की माणसानेच आपली परिस्थिती बदलायची असते.

(b) लेखकास लहानपणापासून स्वातंत्र्याचा अर्थ कळत होता.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) बरोबर आणि (b) चूक (2) (a) चूक आणि (b) बरोबर

(3) दोन्ही बरोबर (4) दोन्ही चूक

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

27. लेखकास अजूनही कोणती चर्चा ऐकावयास मिळते ?

(a) राजकारणी भाषेला धार लावून बोलतात.

(b) प्रत्यक्षात खेडी कृतीने बोलकी बनताहेत.

(c) बुध्दिवंत त्यांच्या भाषेत बोलतात.

(d) सर्वांची वाटचाल थांबली आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) (c) (2) (a), (b), (c)

(3) (a), (d) (4) (a), (b), (c), (d)

---

28. देवराष्ट्रातील माणसे कोणती परिस्थिती बदलण्याचा ध्यास धरून आहेत ?

(a) भकास माळरान (b) कोरडे ओढे

(c) हिरवीगार शिवारे (d) आटलेल्या विहिरी

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b) (2) (b), (c) (3) (a), (b), (d) (4) (a), (b), (c), (d)

---

29. लेखकाच्या काळात कोणते परिवर्तन घडल्याचे पाहावयास मिळते ?

(a) मुले-मुली नेटके कपडे वापरत.

(b) पैरणीची जागा बुशशर्टने घेतली.

(c) साध्या खेड्यातही गांधी टोपीचा जमाना आला.

(d) गावात एखादी मोटार - सायकल दिसे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (c) (2) (a), (b), (d)

(3) (b), (c), (d) (4) (a), (b), (c), (d)

---

30. समाजसुधारणा करण्यासाठी काय करावयास हवे ?

(a) त्या जनतेच्या हृदयावर बिंबल्या पाहिजेत.

(b) जातिवाद नष्ट केला पाहिजे.

(c) वरकरणी 'मानवसेवा केली पाहिजे', असे म्हणत राहणे.

(d) माणसामाणसात एकमेकाविरुध्द वागणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b), (c) (2) (a), (b) (3) (a), (b), (d) (4) (a), (b), (c), (d)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

31. I hope to go to ________ university.

Select the correct alternative to complete the sentence.

(1) a (2) an (3) the (4) no article

32. In this question out of the four alternatives choose the one which can be substituted for the given sentence.

A place where bees are kept.

(1) Aviary (2) Archives (3) Apiary (4) Attic

33. I drank tea, ________ it was hot.

Pick out the correct alternative to complete the sentence meaningfully.

(1) whereas (2) however (3) only (4) yet

34. Pick out the meaning of the word "Bluebeard".

(1) A person who has blue beard

(2) A person of noble birth

(3) A squanderer who spends recklessly

(4) A man who murders his wives

35. Miss Florence Nightingale was the worst enemy of red tapism.

Identify the correct meaning of the underlined phrase.

(1) Delay due to office routine (2) Unpolished manner

(3) Impending danger (4) Colour of the tape

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

36. I wish I knew her native place.

Identify the meaning of the mood expressed in the given sentence.

(1) ardent desire (2) purpose of action

(3) request (4) improbable situation

---

37. There lived a great prince who was rich and powerful.

Identify the type of sentence.

(1) Compound complex sentence (2) Complex sentence

(3) Compound sentence (4) Simple sentence

---

38. Rani asked Raju to let her go then.

Pick out the correct direct narration of the above sentence.

(1) "Let me go now," said Rani to Raju.

(2) "Let her go now," said Rani to Raju.

(3) "Let me go then," said Rani to Raju.

(4) "Let us go now," said Rani to Raju.

---

39. Please wait. He <u>can</u> still came.

Identify the meaning of the modal underlined.

(1) possibility (2) ability (3) capability (4) request

---

40. The two friends <u>fell out</u> over a trifle.

Identify the meaning of the underlined phrase.

(1) quarrel (2) happening (3) desert (4) attack

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

41. Men may be cruel [ ] but man is kind [ ].

Complete the sentence using correct punctuation marks.

(1) [ ; - .] (2) [ , - .] (3) [ : - .] (4) [: - !]

---

42. Choose the correct affirmative for the following negative sentence.

"None but the poor deserve help"

(1) The poor deserve help. (2) The poor deserve only help.

(3) The poor alone deserve help. (4) Except the poor alone deserve help.

---

43. In this question out of the four alternatives choose the one which can be substituted for the given Idiom/Phrase in the sentence.

I was <u>taken aback</u> when Sunil attacked me.

(1) To be taken backwards (2) To be pushed back

(3) To be caught unawares (4) To be thrown back

---

44. The prince was wealthy ________ he was unhappy. Complete the sentence choosing correct alternative.

(1) still (2) and (3) or (4) so

---

45. (a) He turned quickly.

(b) He turned quick.

Identify the correct sentence.

**Answer options :**

(1) Only (a) is correct. (2) Only (b) is correct.

(3) Both (a) and (b) are correct. (4) Both (a) and (b) are incorrect.

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

46. Mohan is (P) certainly (Q) the ablest boy (R) in the class. (S)

Pick out the correct word order to make the sentence meaningful.

(1) QPRS (2) PQRS (3) PRSQ (4) SPQR

---

47. (a) Ram is always hopeful for getting good marks.

(b) Ram always is hopeful of getting good marks.

Identify the correct sentence.

**Answer options :**

(1) Only (a) is correct. (2) Only (b) is correct.

(3) Both (a) and (b) are correct. (4) Both (a) and (b) are incorrect.

---

48. The underlined part of the sentence may have an error. Pick out the correct alternative to make the sentence meaningful. If no error say so.

We <u>have had</u> a very enjoyable holiday last summer

(1) had (2) have (3) have been (4) no error

---

49. Please help him in his work.

Make passive of the sentence.

(1) He helps in his work. (2) Let him help in his work.

(3) One should be helped in work. (4) He may be helped in his work.

---

50. If we ________ wisely there would have been no partition.

Pick out the correct alternative to complete the sentence meaningfully.

(1) had acted (2) acted

(3) have acted (4) would have acted

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

**Read the passage and answer the following questions numbered 51 to 55 on the basis of information provided in the passage.**

Two principles are involved in the controversy about the presence of foreign controlled media in the country; the free flow of ideas and images across national borders and the need to safeguard the national interest and preserve cultural autonomy. Both are valid but both are at loggerheads because each has been used to promote less lofty goals. The first principle conforms to a moral imperative : freedom of expression cannot rhyme with restrictions imposed by any government. But the free flow rhetoric also clouds the fact that the powerful Western, and especially American media, can and often do present, subtly or brazenly, news in a manner that promotes Western political, ideological and strategic interests. Besides, Western entertainment programmes present lifestyles and values that run counter to the lifestyles and values cherished by traditional societies. All this explains why so many Indian newspapers, magazines and news agencies have sought protection from the courts to prevent foreign publications and news agencies from operating in the country. Their arguments are weak on two counts. As the bitter debate on a new world information and communication order demonstrated in the late seventies and early eighties, many of those who resent Western 'invasion' in the fields of information and culture are no great friends of democracy. Secondly, the threat of such an 'invasion' has been aired by those media groups in the developing countries that fear that their business interests will be harmed if Western groups, equipped with large financial and technological resources and superior management skills, are allowed to operate in the country **without let.**

The fear is valid but it goes against the grain of the economic reform programme. The presence of foreign newspapers and television channels will increase competition, which, in the course of time, can only lead to the upgradation of dynamic Indian newspapers and television channels, even while they drive the rest out of the market. One way to strike a balance between the two **antagonistic** principles would be to allow foreign media entry into the country, provided the Indian state treats them at par with the domestic media on all fronts. On the import of technology, for instance, foreign media cannot be allowed duty concessions denied to their Indian counterparts. Foreign media will also have to face legal consequences should they run foul of Indian laws. Why, for example, should the BBC, or *Time* magazine or *The Economist* get away by showing a map of Kashmir, which is at variance with the official Indian map ? Why should they go scot-free when they allow secessionists and terrorists to air their views without giving the government the right to reply, or when they depict sexually explicit scenes, which would otherwise not be cleared by the Censor Board ? Since the government can do precious little in the matter, especially about satellite broadcasts, what if it should consider attaching the properties of the offending parties ? Demands of this kind are bound to be voiced unless New Delhi makes it clear to the foreign media that they will have to respect Indian susceptibilities, especially where it concerns the country's integrity and its culture. It may be able to derive some inspiration from France's successful attempts in the recent GATT to protect its cinematography industry.

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

Choose from the given alternatives the best answer :

51. Why would the entry of foreign media harm local interests ?
   (1) They are better equipped managerially and technologically.
   (2) Our cultural heritage will be lost.
   (3) Economic reform programmes will get a set back.
   (4) Different sets of laws and rules have been made applicable for foreign media.

---

52. Which of the following is one of the points weakening the argument to prevent the entry of foreign media ?
   (1) Such entry would be against traditional culture.
   (2) The threat being voiced by those whose business will be harmed by such an entry.
   (3) The arguments being put forth are at logger heads.
   (4) The foreign media may not be treated on par with the domestic media.

---

53. What will be the impact of increasing competition ?
   (1) The domestic media will not be able to withstand it.
   (2) The foreign media will not be allowed duty concessions on import of technology.
   (3) It will improve Indian newspapers and television.
   (4) The Indian newspapers and news agencies will seek protection from the court.

---

54. Which of the following is the meaning of the phrase 'at variance' as used in the passage ?
   (1) discrepancy (2) at large
   (3) in conformity (4) none of the above

---

55. Choose the word or group of words that is most similar in meaning to the word given in capital taken from the passage.
   RHETORIC
   (1) rhyming words (2) persuasive speaking
   (3) dull monologue (4) tongue - in - cheek

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

**Read the passage and answer the following questions numbered 56 to 60 on the basis of information provided in the passage.**

If humans are naturally moral and reasonable, they should be able to get along together without the state. Belief in progress and improvement in 18$^{th}$ century Europe made this ancient ideal seem realizable.

In 1793, William Godwin (who later married Mary Wollstonecraft) proposed to abolish all laws on the grounds that they were derived from ancient compromises, botched in a state of savagery, that progress rendered obsolete. Small, autonomous communities could resolve all conflicts by face-to-face discussion. The term "anarchism" was invented by Pierre Joseph Proudhon, in 1840, to mean a society run on principles of reciprocity, like a mutual society. Many experimental communities of this sort followed, but none on a scale to rival the conventional state. Meanwhile, the socialist mainstream was seized by followers of the French historian Louis Blanc, who put their faith in a strong, regulatory state to realize revolutionary ambitions, and social democrats, who proposed to capture the state by mobilizing the masses. Anarchists became marginalized as leftist heretics. Under the influence of Mikhail Bakunin's writings, in particular, they became associated with what seemed the only practical alternative revolutionary program : violence by terrorist cells.

Peter Kropotkin was the last great theorist of anarchism. His *Mutual Aid* (1902) was an effective riposte to social Darwinism, arguing that collaboration, not competition, is natural to humankind, and that the evolutionary advantage of our species is our collaborative nature. So social coercion is unnecessary and counter-productive.

Anarchism has seceded from the political forefront since failure in its last great battles, fought during the Spanish Civil War (1936-39), against authoritarianism of left and right alike; in the student revolutionary movements of 1968, it contributed rhetoric, but little effectiveness. Its appeal has always been problematical because the whole Western tradition, since Aristotle first exalted the state as an agent of virtue, has tended to denigrate anarchy. However, it contributed reckless idealism to the ideological struggles of the earlier 20$^{th}$ century. It is possible that the growing strength of concern for freedom on the political left in Europe in the late 20$^{th}$ century was due less to the influence of the libertarian right (as is commonly supposed) than to a lingering anarchist tradition. Certainly a preference for human-scale solutions to social problems, rather than the grand planning advocated by communists and socialists of the past, has become a major theme of the modern left.

---

**56.** Which was the rival society to the conventional state ?

(1) ancient society (2) the anarchist society
(3) socialist society (4) civilized society

---

**57.** Which of the following ideological formulations are against the state ?

(1) Anarchist, democratic and revolutionary
(2) Socialist, ideological and leftist
(3) Leftist, communist and republican
(4) Anarchist, Socialist and Leftist

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

58. Anarchist theory believes in __________.

(1) collaboration (2) competition

(3) coercion (4) authoritarianism

59. What has become a major theme of the modern left ?

(1) revival of the anarchist tradition

(2) concern for freedom

(3) preference for solutions to social problems

(4) the state apparatus

60. The western tradition denigrated anarchy because __________.

(1) it believed in authoritarianism

(2) it exalted the state as an agent of virtue

(3) it believed in liberalism

(4) it believed in social revolution

-oOo-

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

**सूचना** — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. 201. "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल, यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

SEAL